**कृपया प्रसिध्दीसाठी** **18 एप्रिल 2011**

**माजी पेट्रोलियम मंत्री श्री.राम नाईक यांनी पिंपरी - चिंचवड येथे सोमवार, 18 एप्रिल रोजी पत्रकार परिषदेत वितरीत केलेले निवेदन**

---

***पेट्रोलियम संबंधी स्पष्ट धोरण ठरवा,***

***गॅस सिलेंडरची कृत्रिम टंचाई थांबवा !***

**पिंपरी - चिंचवड, सोमवार** : "देशासमोर वाढत्या किंमती आणि भ्रष्टाचार हे दोन अत्यंत महत्त्वाचे प्रश्न आहेत. वाढत्या किंमतीचे प्रमुख कारण पेट्रोलियम पदार्थांच्या वाढत्या किंमती हे असून त्यासाठी भारत सरकारने पेट्रोलियमसंबंधी स्पष्ट धोरण ठरवून ते अंमलात आणण्यासाठी राजकीय इच्छाशक्ती दाखविण्याची गरज आहे," असे प्रतिपादन माजी पेट्रोलियम मंत्री श्री.राम नाईक यांनी पिंपरी - चिंचवड येथे सोमवारी पत्रकार परिषदेत केले.

यासंबंधी अधिक विवेचन करताना श्री.राम नाईक म्हणाले,"भारताच्या पेट्रोलियम पदार्थांच्या गरजेपोटी जवळजवळ 70 टक्के कच्चे तेल (क्रुड ऑइल) आयात केले जाते त्यामुळे अंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या चढउताराचा भारतावर परिणाम होतो. देशाच्या अर्थव्यवस्थेवर आणि ग्राहकांच्यावर विपरीत परिणाम होऊ न देण्यासाठी स्पष्ट धोरण आखण्याची गरज आहे. सध्या पेट्रोलवर आयात कर, महसूल कर आणि विक्रीकर मिळून जवळजवळ 50 टक्के कर आहेत तर डिझेलवर 33 टक्के आहेत. हे कमी करण्याची गरज असून त्यासाठी पेट्रोलियमबद्दल स्पष्ट धोरण ठरवून ते अंमलात आणण्याची राजकीय इच्छाशक्ती पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंहानी दाखविली पाहिजे. सहा वर्षात तीन पेट्रोलियम मंत्री देशाने पाहिले यावरुनच सरकारचा ढिसाळपणा दिसून येतो. "

"देशभर सिलेंडरच्या कृत्रिम टंचाईने परिसीमा गाठली आहे. अनेक ठिकाणी सिलेंडर मिळण्यास एक महिन्यापेक्षा अधिक काळ लागत आहे. वाजपेयी सरकारच्या काळात 4 कोटीपेक्षा अधिक नव्या जोडण्या देऊन आम्ही 24 तासात कोणताही जादा आकार न घेता पुरवठा करत होतो. तर आता असे काय झाले म्हणून विलंब लागत आहे ? त्यामुळे देशभर सर्वत्र उघडपणे काळाबाजार चालू आहे. डोंगरी भागातील आणि झोपडपट्टीतील गरीबांना परवडावे म्हणून आम्ही 5 किलोचे सिलेंडर घरगुती उपयोगासाठी सुरु केले होते तर कॉंग्रेस सरकारने ते घरगुती सिलेंडर बंद केले असून आता व्यापारी दराने विकण्यास सुरुवात केली आहे. ही वस्तुस्थिती पेट्रोलियम मंत्री श्री.जयपाल रेड्डी यांना दि.18 मार्च रोजी प्रत्यक्ष भेटून निदर्शनास आणून दिली. तथापि परिस्थितीत कोणताही बदल झालेला नाही, " असेही श्री.नाईक यांनी सांगितले

"काँग्रसे सरकारमध्ये राजकीय इच्छाशक्तीच्या अभावाचे ताजे उदाहरण म्हणजे तेल माफियांनी उपजिल्हाधिकारी श्री.सोनावणे यांना जाळून ठार मारल्याचे प्रकरण. मी स्वतः पेट्रोलियम मंत्री असताना पेट्रोल - डिझेलमध्ये होणारी भेसळ थांबविण्याच्यादृष्टीने देशभर स्वतंत्र भेसळ प्रतिबंधक विभाग स्थापन करुन भेसळी विरुध्द मोहीम सुरु केली. दिल्ली, मुंबई, चेन्नई कोलकाता येथे विभागीय मुख्यालयेही सुरु केली. वारंवार टाकलेल्या धाडसत्रांमुळे भेसळीचे प्रमाण बरेच कमी झाले होते. परंतु आमचे सरकार गेले आणि काँग्रेस सरकारने भेसळ प्रतिबंधक विभागच बंद करुन टाकला," अशी माहितीही श्री.नाईक यांनी दिली.

स्पष्ट धोरणाच्या अंमलबजावणीचे दुसरे उदाहरण देताना श्री.राम नाईक म्हणाले," ब्राझिलमध्ये ऊसाच्या मळीपासून इथेनॉल बनविण्यात येते. त्याचे मिश्रण पेट्रोलमध्ये केल्यास ते उत्तम इंधन ठरते. त्याप्रमाणेच भारतात करावे म्हणजे कच्च्या तेलाची आयातही कमी होईल तसेच शेतक-यांना मळीलाही योग्य भाव मिळेल या भूमिकेतून मी इथेनॉलचा उपयोग करण्याचा निर्णय घेतला. 2001 साली मिरज येथे पहिला पथदर्शक प्रकल्पही सुरु केला. त्याप्रसंगी ऊस ऊत्पादकातील जाणकार म्हणून आजचे कृषिमंत्री श्री.शरद पवार यांनाही बोलाविले होते. 'राम नाईकानी ऊस ऊत्पादक शेतक-यांना वरदान दिले' असे गौरवोद्‌गारही श्री.शरद पवार यांनी काढले. सुरुवातीला ऊस ऊत्पादक राज्यांत 5 टक्के इथेनॉलचे मिश्रण करावयाचे आणि दुस-या टप्प्यात देशभर 10 टक्के करावयाचे असा निर्णय झाला. त्याप्रमाणे देशात इथेनॉलचे जवळजवळ 50 कारखाने उभे राहिले. परंतु काँग्रेस सरकार आले आणि मद्यसम्राटांच्या दबावाला बळी पडून इथेनॉल खरेदी बंद झाली. आता जागतिक बाजारात कच्च्या तेलाचे भाव पुन्हा वाढल्यामुळे इथेनॉल खरेदीचा काँग्रेस सरकार विचार करीत असल्याचे सांगितले जात आहे. परंतु या प्रकरणी देशाचे आणि शेतक-यांचे सहा वर्षे नुकसान झाले, त्याची जबाबदारी कुणाची ? " असा प्रश्नही श्री.नाईक यांनी उपस्थित केला.

**(कार्यालय सचिव)**